या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

प्रतिनिधी
नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई
वडवणी केज परळी
पाटोदा शिरूर कासार
धारूर आष्टी माजलगाव
इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | सोमवार २० मे २०२४ | अंक१६१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# गरीब मराठ्यांना न्याय मिळालेला नाही. जो इतर समाजाला मिळाला आहे - छत्रपती संभाजीराजे

## मी शिवाजी महाराज शाहूंचा वंशज आहे. सगळ्या बहुजन समाजातील लोकांना सोबत घेऊन जाणं माझी जबाबदारी आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संभाजीराजे छत्रपती यांनी महत्त्वाच वक्तव्य केलय. ‘जातीचा मुद्दा करुन पाडापाडी करणं अत्यंत चुकीच आहे’, असं संभाजीराजे छत्रपती यांनी म्हटलं आहे. ‘गरीब मराठ्यांना न्याय मिळावा, यासाठी माझा लढा आहे’ असं ते म्हणाले. “अठरा पगड बार बलुतेदारांच राज्य आहे. आपल्या जातीवर आपलं प्रेम असणं यात काही चुकीच नाहीय. पण याला पाड हा या जीताचा, तो या जातीचा, मी स्वत: या मताचा नाही.

देशात, महाराष्ट्रात आज पाचव्या टप्प्यासाठी मतदान होत आहे. त्याआधी संभाजीराजे छत्रपती यांनी एक अत्यंत महत्त्वाच वक्तव्य केलं आहे. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटीलही पुन्हा चर्चेत आले आहेत.

लोकसभा निवडणुकीसाठी मुंबईसह महाराष्ट्रात, देशात आज पाचव्या टप्प्याच मतदान होत आहे. या मतदानाआधी छत्रपती संभाजीराजे यांनी एक अत्यंत महत्त्वाच विधान केलय. एकाबाजूला मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील पुन्हा चर्चेत आले आहेत. मराठा समाजाला आरक्षण मिळावं, यासाठी पुन्हा आंदोलन सुरु करण्याच्या तयारीत ते आहेत. सुरुवातीला मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनाला राज्यात भरघोस प्रतिसाद मिळाला होता. राज्यातील मराठा समाज भक्कमपणे त्यांच्या पाठिशी असल्याच चित्र दिसलं होतं. सध्या राज्यात लोकसभेच्या निवडणुका सुरु आहेत. त्यानंतर सहा महिन्यांनी विधानसभेच्या निवडणुका येतील. त्यावेळी मनोज जरांगे पाटील आणखी आक्रमक भूमिका



घेऊ शकतात.दरम्यान लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संभाजीराजे छत्रपती यांनी महत्त्वाच वक्तव्य केलय. ‘जातीचा मुद्दा करुन पाडापाडी करणं अत्यंत चुकीच आहे’, असं संभाजीराजे छत्रपती यांनी म्हटलं आहे. ‘गरीब मराठ्यांना न्याय मिळावा, यासाठी माझा लढा आहे’ असं ते म्हणाले. “अठरा पगड बार बलुतेदारांच राज्य आहे. आपल्या जातीवर आपलं प्रेम असणं यात काही चुकीच नाहीय. पण याला पाड हा या जीताचा, तो या जातीचा, मी स्वत: या मताचा नाही. मी शिवाजी महाराज शाहूंचा वंशज आहे. सगळ्या बहुजन समाजातील लोकांना सोबत घेऊन जाणं माझी जबाबदारी आहे. माझा मराठ्यांसाठी लढा का आहे? गरीब मराठ्यांना न्याय मिळालेला नाही. जो इतर समाजाला मिळाला आहे” असं छत्रपती संभाजीराजे म्हणाले.

## संत बंकट स्वामी महाराज यांनी नेकनुर गावाला आळंदी - पंढरपूर सारखे पुण्य क्षेत्रं बनवण्याचे काम केलं.



**( पाटोदा प्रतिनिधी )**

बीड - दि १९ संत बंकट स्वामी महाराज यांनी नेकनुर गावाला आळंदी - पंढरपूर सारखे पुण्य क्षेत्रं बनवण्याचे काम केलं.. पृथ्वीतलावरील सर्वात मोठे देव संत आहेत..अस प्रतिपादन भागवत कथाप्रवक्ते गोवत्सल राधाकृष्णजी महाराज यांनी केले. श्रीक्षेत्र नेकनूर येथे सुरू असलेल्या भव्य दिव्य श्रीमद्भागवत कथेत ते बोलत होते.. यावेळी हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.. राधाकृष्ण जी महाराज यांच्या सुमधुर वाणीतील भजनामध्ये हजारो भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले.. बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा सुरू आहे. सुप्रसिद्ध भागवत कथाकार राधाकृष्ण जी महाराज राजस्थान यांच्या सुमधुर वाणी मधून कथा रसपान करण्याचा सुयोग भाविक भक्तांना लाभला आहे.. तिसऱ्या दिवसाचे कथापुष्प समर्पित करताना कथाव्यास श्री महाराज यांनी जागतिक स्तरावर उपग्रहाच्या माध्यमातून ज्यावेळी पृथ्वीवर संशोधन केले त्यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या समाधी स्थळावर ऊर्जा केंद्र असल्याचे आढळून आले जे समाधी स्थळ संपूर्ण जगाला प्रकाशमान करू शकते..संत हे प्रत्यक्ष देव आहेत संत सगळ्यात मोठे देव आहेत. देवाला जे देखील वैकुंठा मध्ये करमत नसेल तर ते संतांच्या सदनामध्ये येऊन राहतात . देवालाही आनंद मिळवायचा असेल तर देव संतांच्या सानिध्यामध्ये येतो..धन्य धन्य संतांचे सधन तेथ लक्ष्मी सहित शोभे नारायण .. ज्या सुखा कारणे देव वेडावला वैकुंठ सोडूनी संत सदनी राहिला!! या अभंगाचे प्रमाण देत महाराजांनी संतांच्या सानिध्यामध्ये खरे सुख आहे असा विषय मांडला..चिंता त्रास असेल तर दुसरीकडे कुठे न जाता संताच्या दरबारात जावं . देव ही संताच्या दरबारात येते तेव्हा त्यालाही आनंद अनुभव मिळतो.. संतोकाचे महत्व कळत नाही. ज्यांना कळले ते धन्य आहे. जीवाला प्रेम पाहिजे असेल तर प्रेम देणारा एकमेव परमेश्वर आहे. संसारामधून प्रेमाची अपेक्षा होऊ शकत नाही. प्रत्येकाने आत मध्ये डोकावल पाहिजे.. कधीतरी स्वतःसाठी गीत गाईला पाहिजे. स्वतःसाठी कथाही केली पाहिजे असाही राधाकृष्ण महाराज म्हणाले. या ठिकाणी संत बंकट स्वामी महाराजांनी बोलावलं यामुळेच कथेसाठी येण्याचा योग आला असल्याचा उद्गार देखील महाराजांनी काढले.. कृष्ण कथाही अमृतपान आहे त्यामुळे कथेच्या सागरात आनंद घेण्यासाठी प्रत्येकाने सहभागी व्हावं असा आवाहन देखील महाराजांनी केलं..

## सौंदाना गावात कापूस जळून तीन ते साडेतीन लाख रुपयांचे नुकसान

**प्रतिनिधी/बीड**

रोजी सध्या बीड तालुक्यात सौंदाना गावात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झालेली आहे एवढी दुष्काळी परिस्थिती असताना शासनाच्या निष्काळजीपणामुळे शेतकऱ्यांच्या मालाला भाव नसल्यामुळे बीड तालुक्यातील प्रत्येक गावात भाव नसल्यामुळे कापूस घरात पडून आहेत तसेच सौंदाना ताजी बीड येथे सौ मिनाबाई अशोक गायके यांच्या घरी भागवत हा धार्मिक कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे याही वर्षी चालू होता यातच सकाळी दहाच्या सुमारास घरामध्ये 25 ते 30 क्विंटल कापूस असताना अचानक शॉर्ट सर्टिफिकेट मुळे कापसाला आग लागली यातच तीन ते साडेतीन लाख रुपयांचे नुकसान झाले यावेळी गावातील तरुण मुलांनी धाव घेतली आणि कापूस विजवण्याचा प्रयत्न केला पण अगोदरच सर्व कापूस जळून खाक झाला होता यामुळे सौ मीनाबाई अशोक गायके या शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे तरी या कुटुंबाला शासनाने मदत करावी अशी मागणी गावातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके व युवा कार्यकर्ते श्री प्रवीण कथले व अशोक मामा घोलप यांनी केली आहे. तरी याचा पंचनामा



कुमसी सज्जाचे व सौंदाना गावाचे तलाठी सौ स्वाती घुगे मॅडम यांनी पंचनामा केला यावेळी गावातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके तसेच प्रवीण कथले युवा कार्यकर्ते तसेच भाजपाचे तालुका अध्यक्ष अशोक मामा घोलप गावातील प्रतिष्ठित व्यक्ती यांनी वेळीच दखल घेऊन पंचनामा करताना हजर होते

## नायगाव येथे ३१ रक्तदात्यांचे रक्तदान



**प्रतिनिधी/केज**

तालुक्यातील मौजे नायगांव येथे परिवर्तनवादी युगपुरुष जगतज्योती महात्मा बसवेश्वर,रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज आणि महामानव विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी राहुल खोडसे यांच्या पुढाकारातून महामावांच्या संयुक्त जयंती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ३१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदान करून आपण एखाद्याचा जीव वाचवू शकतो त्यामुळे रक्तदान करावे असे आवाहन स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाचे कर्मचारी यांनी केले आहे.

यावेळी राहुल खोडसे,प्रविण खोडसे,सुधाकर खोडसे,सुरेश खोडसे, ऋषी देशमुख, ऋषि खोडसे, रोहन खोडसे, शार्दूल कुलकर्णी,भालगाव येथील अरविंद मोरे,अनेगावचे सरपंच अशोक गवळी जयदीप इंगळे राज खोडसे,प्रकाश खोडसे यांनीही सहभाग नोंदवला होता

## नर्सिंगच्या नवीन अभ्यासक्रमामुळे संधी वाढल्या रमा गिरी यांचे प्रतिपादन; माऊली नर्सिंगमध्ये शपथग्रहण सोहळा

**बीड : प्रतिनिधी**

नर्सिंग क्षेत्रामध्ये करिअरच्या संधी मोठ्या प्रमाणात आहेत. आता नवीन अभ्यासक्रमामुळे हा अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी परदेशातही सक्षमपणे रुग्णसेवा करु शकतात असे प्रतिपादन जिल्हा रुग्णालयाच्या मेट्रन रमा गिरी यांनी केले.बीड शहरातील धानोरा रोडवर असलेल्या माऊली नर्सिंग कॉलेजमध्ये विद्यार्थीनींचा शपथग्रहण सोहळा आयोजीत करण्यात आला होता. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून गिरी बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर डॉ.अजय विघ्ने, डॉ.वर्षा तिडके, रंजना मॅडम, संस्थेचे सचिव डॉ.महादेव मुंडे, प्रा.संगीता मुंडे, दत्तात्रय चोले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी दिपप्रज्वलन करुन फलोरेन्स नाईटींगेल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर विद्यार्थीनींना शपथ देण्यात आली. यावेळी बोलतांना रमा गिरी म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी नर्सिंग क्षेत्रात करिअर करतांना समर्पण भावना ठेवणे आवश्यक आहे. या क्षेत्रात तुम्हाला तुमच्या करिअरबरोबरच रुग्णसेवेलाही तेव्हढेच महत्त्व द्यावे लागणार आहे. आज विविध क्षेत्रात मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. नर्सिंग क्षेत्रही याला अपवाद नाही. असे असतांनाही आरोग्यविषयक विविध सेवांमध्ये हा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना संधी मिळू शकते. यातही आता नवीन अभ्यासक्रमामुळे विद्यार्थी परदेशातही




चांगल्या पद्धतीने सेवा देऊ शकतात असे गिरी यांनी सांगितले. यावेळी डॉ.अजय विघ्ने, डॉ.वर्षा तिडके, डॉ.महादेव मुंडे, प्रा.संगीता मुंडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य पोपळे, धनंजय मेडकर सर, शुभम जोगदंड, किरण वडमारे मॅडम, आदिंसह विद्यार्थी-विद्यार्थीनींची उपस्थिती होती.

